रे.मु.नं.८११/१९९९
दिगंबर वि. सोनबा

## <u>निशाणी क्र.७७ वरील आदेश</u>

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१अ ते ४ यांनी त्यांचा प्रथम पुरावा द्यावा यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, त्यांनी प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादी नं.१ व प्रतिवादी नं.१ हे सख्खे भाऊ आहेत. ते मयत आहेत. दावा मिळकती ह्या वादी प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या आहेत. त्यामध्ये अद्याप वाटप झालेले नाही. कौटुंबिक व्यवस्था म्हणून जमिनी नावे केल्या आहेत. प्रतिवादीने निशाणी ११ कडे त्यांची कैफीयत दाखल केली आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीचे वाटप झाले आहे असे कथन केले आहे. त्यावरुन निशाणी १२ कडे मुद्दे काढले आहेत. त्यामध्ये मुद्दा क्र.२ हा पुर्वीच्या वाटपाबाबतचा आहे. तो शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची आहे. वादीच्या कथनानुसार वाटप झाले नाही तर प्रतिवादीच्या कथनानुसार वाटप झाले. त्यामुळे सकारात्मक बाब शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची आहे. त्यामुळे त्याबाबत प्रथम पुरावा देण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यावर येते व त्यानंतर पुरावा देण्याची जबाबदारी वादीची आहे. अशा परिस्थितीमध्ये कायद्यानुसार प्रथम पुरावा प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सुरु करणे गरजेचे आहे.

३. प्रतिवादी क्र.१अ ते ४ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ७८ कडे दाखल करुन वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नसल्याचे कथन करुन तो अमान्य केला. तसेच अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व बनावट असल्याचे कथन केले. व प्रस्तुतचा अर्ज कोणत्या तरतुदी खाली दिला हे स्पष्ट होत नाही.

४. प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादीचा दावा व त्यांनी दिलेली कैफीयत यावरुन मुद्दे काढलेले आहेत. दावा वाटपाचा आहे. वाटपाच्या दाव्यात वादी प्रतिवादींचे स्थान एकच राहते. वादीने दावा

कलम ५ मध्ये वादी नं.१ व प्रतिवादी नं.१ चे वाटप होऊन खातेफोड म्हणून वेगवेगळ्या जमिनी प्रत्येकाच्या नावावर लागल्या आहेत. तसेच सन १९७५ नंतर वादी प्रतिवादी हे त्यांचे नावे असणाऱ्या जमिनी स्वतंत्रपणे वहिवाटून उत्पन्न घेवू लागले आहेत. वादी नं.१ ने व प्रतिवादी नं.१ ने काही जमिनी खरेदी घेतल्या आहेत. त्या जमिनी दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत. वाद मिळकतीशिवाय वादी व प्रतिवादी यांच्याकडे असलेले क्षेत्र समान आहे. त्यामध्ये त्यांनी सुधारणेसाठी प्रयत्न केला. त्यामुळे त्या वाटपात घेतल्या नाहीत. या वादीच्या कथनावरुन वादी म्हणतो त्याप्रमाणे मिळकतीचे वाटप झाले असतानासुध्दा पुन्हा वाटपाचा दावा दाखल केला आहे. तसेच प्रस्तुतचा दावा हा रिओपनिंग पार्टीशनचा देखील नाही व तसे दाव्यात प्लीडींग देखील नाही. त्यामुळे दावा वाटपासाठी आणलेला असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम १ नुसार पुरावा देण्याची जबाबदारी वादीची आहे. तसेच प्रतिवादीने प्रथम पुरावा द्या असा हुकूम करण्याचा अधिकार न्यायालयास नाही. वादी स्वतःच वाटप झाले आहे परंतु ते समान झाले नाही असा दावा घेऊन आलेला आहे. तसेच पुराव्याचा कायदा कलम ११० नुसार दावा शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम ३ प्रमाणे वादीने पुरावा देणे आवश्यक आहे. व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर
करण्याची विनंती केली.

५. वादीचे विद्वान विधीज्ञ श्री. जी.पी. कदम यांनी युक्तीवाद केला की, सर्व दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादी मध्ये सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. केवळ कौटुंबिक व्यवस्था म्हणून वाटप केलेले आहे. ते वाटप होऊ शकत नाही. प्रतिवादींनी त्यांचे

कैफीयतीमधील परिच्छेद क्र.११ मध्ये पुर्वीचे वाटपाबाबत नमुद केले आहे. सबब ते शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे. त्यासाठी प्रथम पुरावा प्रतिवादींनी दिला पाहीजे.

६. याउलट प्रतिवादींचे विद्वान विधीज्ञ श्री.फडे यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी हे पुर्वीच पार्टीशन झाले आहे अशी केस घेऊन आले आहेत. त्याप्रमाणे वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरण हे पुनर्वाटपाचे नाही व शेवटी त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

७. अर्ज वाचला, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे पाहीले. अभिलेख अवलोकीला. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. तर प्रतिवादींनी त्यांचे कैफीयतीमध्ये वादमिळकतीचे वादी प्रतिवादी मध्ये सन १९५० मध्ये वाटप झाल्याचे नमुद केलेले आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १८ नियम १ नुसार प्रकरणात पुरावा प्रथम वादीने दिला पाहीजे. वादीने दाव्यातील कथने स्वतः शाबीत केली पाहीजेत. प्रस्तुत दावा वाटपाचा आहे. वाटपाच्या दाव्यातील प्रतिवादी हे देखील वादीच असतात. वादी वाटप झाले नाही असे कथन करत आहे तर प्रतिवादी क्र.१ ते ४ हे पुर्वीच वाटप झाले आहे असे सकारात्मक कथन करत आहेत. सबब सकारात्मक कथन शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे व नकारात्मक बाब वादीस प्रथम शाबीत करण्यास सांगणे उचित होणार नाही. प्रतिवादींनी वाटप झाले आहे असे प्रतिपादन केले असल्याने व प्रस्तुत दावा हा वाटपाचा असल्याने त्याची शाबीती प्रतिवादींनी केली पाहिजे. एकदा का प्रतिवादींनी ती बाब शाबीत केली की वादी सदरची बाब त्याच्या पुराव्याद्वारे तद्नंतर खोडून काढू शकतो. सबब अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब आदेश.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.७७ विनंतीनुसार मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना निर्देश देण्यात येतात की, त्यांनी त्यांचा पुरावा प्रथम सादर करावा.

माळशिरस

दिनांक २५/०१/२०१९ दि.न्या.व.स्तर माळशिरस

**C E R T I F I C A T E**

**I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.**

(a) Name of the Stenographer : S.S.Mitragotri
(b) Court : Civil Court Senior Division, Malshiras.
(c) Judgment signed by P.O. on : 25.01.2019.
(d) Judgment uploaded on : 11.02.2019.